Post Regd. No. : KLR-344/2019-2021

मासिक (R.N.I. NO. MAHMAR/74837 /2016

# शिखरावरी

कोल्हापूर

**दि फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशन मुंबई व 'यशोदर्शन फोंडेशन' कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाने समर्पित**

■ संस्थापक : श्री. योगेश अग्रवाल (मो. : 09155677777) ■ वेबसाईट www.shikharawari.com

■ मार्गदर्शक : श्री. पुरुषोत्तम पवार (वसई, मुंबई) (मो.: 9822049675) ■ निवासी संपादक : सिमा मकोटे (मो.: 9762809762

■ मुख्य कार्यकारी संपादक : श्री. प्रमोद दाभाडे (M. J. L.L.B) (मो.: 9850619233)

■ वर्ष ५ वे ■ अंक ९ वा ■ बुधवार दि. ०१-१२-२०२१ ■ पाने : ४ ■ मूल्ये : १० रू

**'यशोदर्शन फोंडेशन' द्वारे अवयवदान श्रेष्ठदान जनजागृती अभियान**

□ वेबसाईट www.yashodarshan.in □ वेबसाईट www.shrimoreshwarnath.in

**संयोजक : श्री मोरेश्वरनाथ सेवा प्रतिष्ठान, कसबा बावडा, कोल्हापूर.**

**अवयवदान जनजागृती अभियान**

अवयवदान, त्वचादान, देहदान, नेत्रदान
या चळवळीला तळागळापर्यंत पोहचवूया,
या विराट संकल्पमध्ये सामिल होऊया!
म्हणून इच्छुकांना अवयवदानवर माहितीसाठी संपर्क करू शकता.

**संपर्क श्री योगेश अग्रवाल**
(मो. ९१५५६७७७७७, ९२२५३१४१५१)
धन्यवाद.



**योगेश अग्रवाल**
संस्थापक अध्यक्ष :
यशोदर्शन फौंडेशन, कोल्हापूर
संस्थापक : मासिक
'शिखरावरी'



बसलेले डावीकडून : श्री कुमार कदम, श्री सुनील देशपांडे, श्री हरकचंद सावला, श्री पुरुषोत्तम पवार, श्री विनोद हरिया. उभे डावीकडून : श्री प्रशांत पागनीस, श्री शैलेश देशपांडे, श्री चंद्रशेखर देशपांडे, श्रीमती वंदना वानखेडे, श्री नागराजन अय्यर, श्री श्रीकांत कुलकर्णी, श्री सतीश पाटणकर, श्रीमती मीरा सुरेश.

# फेडरेशन ऑफ ऑर्गन अ‍ॅन्ड बॉडी डोनेशनच्या नव्या पदाधिकाऱ्यांची निवड

मुंबई फेडरेशन ऑफ ऑर्गन अ‍ॅन्ड बॉडी डोनेशन या अवयवदान आणि देहदान या संकल्पनेच्या प्रसारासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थेच्या अध्यक्षपदी वसई (जि. पालघर) येथील उद्योजक श्री. पुरुषोत्तम पवार, तर सचीवपदी पुणे येथील चार्टर्ड अकाउंटंट श्री. श्रीकांत कुळकर्णी यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. शनिवार दि. १३ नोव्हेंबर, २०२१ रोजी मुंबईत मावळते अध्यक्ष सुप्रसिध्द समाजसेवक श्री. एच. के. सावला यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नव्या पदाधिकाऱ्यांची एकमताने निवड करण्यात आली. उपाध्यक्षम्हणून सर्वश्री विनोद हरीया (मुलुंड), सुधीर बागाईतकर (नवी मुंबई) व सुनिल देशपांडे (नाशिक), खजिनदारम्हणून श्री. शैलेश देशपांडे, संयुक्त सचीवम्हणून श्री. प्रशांत पागनीस तसेच कार्यकारणी सदस्यम्हणून सर्वश्रीमती मीरा सुरेश, डॉ. कामाक्षी भाटे, वंदना वानखेडे, डॉ.शुभदा कुडतरकर, सर्वश्री अनिरूध्द कुळकर्णी, सतीश पाटणकर आणि एन.पी.अय्यर यांची निवड करण्यात आली. संस्थेचे मुख्य समन्वयकम्हणून ज्येष्ठ पत्रकार कुमार कदम यांची फेरनिवड करण्यात आली आहे.

अवयवदान आणि देहदान ही कृती काळाची गरज आहे, हे ओळखून या विषयात देशभर कार्यरत सर्व छोट्या-मोठ्या सेवाभावी संस्थांना एकत्र आणून एकमेकांशी संलग्न करून ही चळवळ जोमाने पुढे नेण्याच्या उद्देशाने द फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशन ही नोंदणीकृत संस्था कार्य करीत आहे. या नोंदणीकृत संस्थेची रितसर स्थापना २७ मे २०१५ रोजी झाली असून ही संस्था भारत सरकारच्या राष्ट्रीयकृत रोटो सोटो (ROTTO-SOTTO) या संस्थेची संलग्न संस्था (सोशिएट एन्जिओ) म्हणूनही कार्य करीत आहे. संस्थेचे सर्व पदाधिकारी हे अवयवदान आणि देहदान चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते आहेत. संस्थेच्या माध्यमातून सध्या संपूर्ण महाराष्ट्रात अवयवदान आणि देहदानासाठी जनजागृती केली जात आहे. त्यासाठी संस्थेतर्फे गेल्या चार वर्षात राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये चार पदयात्रा काढण्यात आल्या आहेत. या पदयात्रांच्या माध्यमातून तिच्या मार्गावरील सर्व गावे आणि प्रमुख शहरातील सर्वसामान्य जनतेला सभा, कार्यशाळा, पदनाट्य अशा माध्मातून अवयवदान आणि देहदानाचे महत्त्व पटवून देण्याचा प्रयतक करण्यात आला आहे.

# अवयवदान दिन

**कांही वर्षांपूर्वी जेव्हा मी अवयवदानाच्या कार्यामध्ये सामील व्हायचे ठरवले तेव्हा सहाजिकच इंटरनेटवर शोध घेतला की जागतिक अवयवदान दिन केव्हा असतो ? त्यावेळेला माझ्या सर्व शोधांमध्ये मला १३ ऑगस्ट ही तारीख जागतिक अवयवदान दिनाची म्हणून मिळाली. त्यानंतर १३ ऑगस्ट रोजी जागतिक अवयवदान दिनाच्या औचित्याने काही कार्यक्रम करीत राहिलो. त्यानंतर एकदा या क्षेत्रातील एक कार्यकर्ता मला म्हणाला की १३ ऑगस्ट बाबत बरेचसे मतभेद आहेत. पुन्हा मी चौकशी केली इंटरनेट विश्वातून आणि अनेकांशी चर्चा केली त्यातून मला असे समजले की १३ ऑगस्ट हा अवयवदान दिन म्हणून साजरे करणे हे जगामध्ये प्रथम टाइम्स ग्रुप ने ठरवले. टाइम्स ग्रुपने दरवर्षी १३ ऑगस्टला अवयवदान दिन साजरा करण्यास सुरुवात केली, त्यानंतर १३ ऑगस्टच्या अवयवदान दिनासाठी अनेक संस्था आणि अनेक देशातील अनेक कार्यकर्ते सामील होऊन त्यांनी १३ ऑगस्ट हा जागतिक अवयवदान दिन म्हणुन साजरा करण्यास सुरुवात केली. परंतु त्यानंतर युनोच्या मान्यतेने सर्व देशांनी आपल्या देशात २७ नोव्हेंबर हा राष्ट्रीय अवयवदान दिन म्हणून साजरा करण्याचे नक्की केले. तेव्हापासून नोव्हेंबर रोजी अनेक देशांमध्ये राष्ट्रीय अवयवदान दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानंतर आणखी काही माहिति गोळा करता असे समजले की काही देशांमध्ये आणि काही आंतरराष्ट्रीय संस्थांतर्फे ६ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट हा अवयवदान सप्ताह म्हणून साजरा केला जातो.**

**सुनील देशपांडे**
व्हाईस प्रेसिडेंट, द फेडरेशन ऑफ ऑर्गन न्ड बॉडी डोनेशन, मुंबई.
संचालक, मृत्युंजय ऑर्गन फाउंडेशन, नाशिक
सदस्य, विभागीय मानवी अवयव प्रत्यारोपण प्राधिकार समिती. धुळे

सन २०१६ पासून महाराष्ट्र शासनाने महा अवयवदान अभियान या नावाने हा अवयव दानाचा उत्सव दरवर्षी साजरा करण्याचे ठरवले. परंतु त्याच्या तारखा काही निश्चित केल्या गेल्या नाहीत. पहिली दोन वर्षे ऑगस्ट महिन्यातील शेवटच्या आठवड्यात हे उत्सव केले गेले. पहिल्या वर्षी सर्व वैद्यकीय महाविद्यालये आणि शिक्षण संस्था यांनी मोठ्या प्रमाणात शहरातून फेऱ्या काढून अवयवदान जागृतीचा प्रयतक केला गेला. नंतरच्या वर्षी ग्रामीण भागात सरकार तर्फे हा महा अवयवदान महोत्सव साजरा करण्यासाठी सांगण्यात आले. ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींनी अवयवदानाचे ठराव पारित केले. प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये मोठ्या समारंभाने अवयवदानाच्या प्रतिज्ञा उच्चारल्या गेल्या. शिक्षण संस्थांच्या सहाय्याने शाळा व महाविद्यालयांमध्ये अवयवदाना संबंधी अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले गेले. नंतरच्या वर्षी सप्टेंबर मध्ये हा अवयव दान महोत्सव साजरा करण्यासाठी एक परिपत्रक निघाले ते ८-१० दिवस आधीच विविध संस्थांना प्राप्त झाले. पण मग त्याची फार मोठी दखल घेतली गेल्याचे जाणवले





नाही. नाशिक येथे आम्ही आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या सहकार्याने जागर अवयवदानाचा हा कार्यक्रम सादर केला होता. परंतु आधीच्या दोन वर्षाचा उत्साह नंतरच्या वर्षी दिसला नाही. या क्षेत्रातील कार्य करणाऱ्या अनेक संस्था आणि कार्यकर्ते यांच्यापर्यंत अवयवदान महोत्सवाची वार्ताच पोचली नव्हती. सरकारी परिपत्रके अनेक सरकारी कार्यालयांच्या फाईल मध्येच पडून होती. त्यामुळे असे म्हणावेसे वाटते दरवर्षी परिपत्रक काढून त्याच्या तारखा जाहीर करण्यापेक्षा, महा अवयवदान महोत्सवाची एक निश्चित तारीख ठरवल्यास विविध सामाजिक संस्था त्यात उत्साहाने भाग घेऊन महा अवयवदान महोत्सव खूप मोठ्या प्रमाणावर साजरा करता येईल. त्या पद्धतीचे सूचनापत्र आम्ही आरोग्य शिक्षण मंत्र्यांना पाठवले आहेच. पण मुळात आमच्या काही कार्यकर्त्यांनी असा प्रश्न उपस्थित केला की आपण कोणता दिवस साजरा करायचा ? त्यावेळी मला एका राजकीय पुढाऱ्याची आठवण झाली. त्यांना (पान २ वर)

# जायंटस ग्रुप ऑफ कोल्हापुर सिटी तर्फे त्वचादान, नेत्रदान व अवयवदा या विषयावर शिबिर

कोल्हापूर : जायंटस ग्रुप ऑफ कोल्हापुर सिटी तर्फे त्वचादान, नेत्रदान व अवयवदा या विषयावर शिबिर रामभाई सामाणी हॉल उद्यमनगर येथे संपन्न झाला. डॉ दिलीप पटवर्धन यानी त्वचा दान पध्दती व त्याचे महत्व तसेच गंभीर रित्या भाजलेल्या लोकांसाठी त्वचेची उपयुक्तता समजावून दिली.*

तसेच अवयवदान कोणत्या परीस्थितीमध्ये केले जाते व ग्रीन कॉरीडार व अनेक रुग्णांचे वाचणारे जीव या सर्वांची विडीओ फिल्म दाखवुन माहीती दिली. नेत्रदान व नेत्र रोपनामध्ये आलेले नवीन तम तंत्रज्ञान या संबंधीची चित्रफिती द्वारे माहीती दिली. जायंटस वेल्फेअर फौड़ेशनचे केंद्रिय समिती सदस्य प्रमोद शहा यांचे प्रेरणेतुन जायंटस ग्रुप ऑफ कोल्हापुर सिटीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. जागेवरच ३० लोकांनी त्वचादान व नेत्रदानाचा संकल्प सोडला व आणखी ही प्रतिसाद मिळत आहे.

कार्यक्रमासाठी माजी उपमहापौर भुपाल शेटे तसेच डॉ सतीश बापट,राम नारायण उटवाल,सौ मंगला कुलकर्णी, सौ कमल उंटवाल डॉ राजकुमार पोळ, शिखरावरीचे संपादक योगेश अग्रवाल, रेवणकर, प्रकाश क्षीरसागर, भुषण शहा,डॉ दिवाण सौ साकरे मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते.





# सतेज उर्फ बंटी डी. पाटील विधानपरिषद निवडणूकीत बिनविरोध

- विधान परिषदेच्या ४ जागा बिनविरोध
- कोल्हापूर-काँग्रेस, मुंबईत शिवसेना व भाजप प्रत्येकी १, धुळे भाजपकडे
- दोन जागांसाठी लढत : नागपुरात भाजप विरुद्ध काँग्रेसमध्ये चुरस; अकोल्यात शिवसेना-भाजपमध्ये सामना

मुंबई : संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या विधान परिषद निवडणुकीत सत्ताधारी आणि विरोधक यांच्यामध्ये झालेल्या शिष्टाईत चार जागा बिनविरोध निवडून आल्या आहेत. मात्र दोन जागा बिनविरोध करण्याबाबत एकमत न झाल्याने या दोन जागांवर चुरशीची लढत होणार आहे. नागपूर मतदारसंघात भाजप विरुद्ध काँग्रेस तर अकोला-वाशिम-बुलडाणा मतदारसंघात शिवसेना विरुद्ध भाजप असा सामना रंगणार आहे. मुंबईच्या दोन आणि कोल्हापूर व धुळे अशा चार जागा बिनविरोध झाल्या आहेत.

या निवडणुकीपूर्वी राज्यात आरोप-प्रत्यारोपांचे पेवच फुटले होते. त्याचवेळी ईडीच्या कारवाया, मंत्र्यांवरील आरोप, महाविकास आघाडीवर चौफेर टीका आणि महाविकास आघाडीच्या मंत्र्यांकडून दिले जाणारे प्रत्युत्तर त्यामुळे राजकीय वातावरण ढवळून निघाले होते. या पार्श्वभूमीवर होणाऱ्या निवडणुका ईर्ष्येने लढल्या जाणार, अशी चर्चा होती. मात्र मर्यादित मतदारसंघ, विद्यमान आमदारांचा मतदारांशी थेट संपर्क आणि त्यांचा प्रभाव यामुळे सुरुवातीला सोपी वाटणारी निवडणूक प्रस्थापित उमेदवारांविरुद्ध अवघड होत असल्याचे चित्र दिसले आणि ज्याच्या जागा त्याच्याकडे ठेवायच्या, अशा एका समान धाग्यातून बिनविरोध निवडणुकीची चर्चा सुरू झाली.

वाटाघाटी होऊन अखेर भाजप आणि काँग्रेसने आपल्या उमेदवारांना तीन मतदारसंघांत माघार घ्यायला लावली आणि चार उमेदवार बिनविरोध निवडून आले. मुंबईत विधान परिषदेच्या दोन जागा असून शिवसेनेचे सुनील शिंदे आणि भाजपचे राजहंस सिंह हे निवडून आलेत. तेथे काँग्रेस पुरस्कृत उमेदवार सुरेश कोपरकर यांनी माघार घेतली. येथे माघारीसाठी काँग्रेसने मदतीचा हात पुढे केला. त्यामुळे भाजप आणि शिवसेनेला विजय मिळाला.

कोल्हापूर मतदारसंघात चुरस होती. मात्र भाजपने धुळ्याची निवडणूक प्रतिष्ठेची केल्यामुळे काँग्रेसचे गौरव वाणी यांनी माघार घेतली. त्यामुळे कोल्हापुरातून भाजपचे माजी आमदार अमल महाडिक यांनी माघार घेतली. भाजपच्या माघारीमुळे कोल्हापुरात गृह राज्यमंत्री सतेज पाटील तर धुळ्यातून माजी मंत्री भाजपचे अमरिश पटेल बिनविरोध निवडून आले.

नागपूर आणि अकोला मतदारसंघांत मात्र ही निवडणूक ईर्ष्येने लढली जाणार आहे. नागपूरमध्ये भाजपचे माजी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे विरुद्ध काँग्रेसचे छोटू भोयर यांच्यात लढत होणार आहे. भोयर हे भाजपमधून अलीकडेच काँग्रेसमध्ये आले आहेत. ते माजी उपमहापौर आहेत. बावनकुळे यांना विधानसभेत उमेदवारी नाकारण्यात आली होती. तेव्हापासून ते नाराज होते. आता उमेदवारी देऊन त्यांची नाराजी दूर करण्यात आली आहे.

भाजपकडे आज ६० मते जादा आहेत, असे विचारले असता काँग्रेसचे नागपूरचे उमेदवार डॉ. सुनील ऊर्फ छोटू भोयर म्हणाले की, ही निवडणूक वैयक्तिक संबंधातून लढविली जाते. चंद्रशेखर बावनकुळे हे निवडून यावेत, असे भाजपच्या नेत्यांना तरी वाटते का, या प्रश्नातच आपला विजय आहे.

अकोला - बुलडाणा - वाशिम मतदारसंघात शिवसेनेचे विद्यमान आमदार गोपीकिशन बजोरिया यांच्या विरोधात भाजपचे वसंत खंडेलवाल रिंगणात आहेत. शिवसेना भाजपच्या ताणलेल्या राजकीय संघर्षाच्या पार्श्वभूमीवर ही निवडणूक प्रतिष्ठेची आहे.

# कोल्हापूर जिल्हा बँक निवडणुक जाहीर

## न्यायालयाच्या दोन निकालाने मार्ग मोकळा : ५ जानेवारीला मतदान ७ जानेवारीला मतमोजणी

**कोल्हापूर : कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या मतदार यादीत नावे समाविष्ट करावी, अशी मागणी केलेल्या १५ संस्थांची याचिका उच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळली. न्यायालयाच्या निर्णयाने निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला असून ५ जानेवारी रोजी मतदान तर ७ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. दरम्यान, सोमवारपासून (दि. २९) उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात होणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अरुण काकडे यांनी दिली.**

मडिलगे (आजरा) येथील शंकरलिंग विकास संस्थेने बँकेची निवडणुका घेण्याबाबत उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर २५ नोव्हेंबरला सुनावणी होऊन निवडणूक प्रक्रिया तत्काळ सुरू करण्यात यावी, असे आदेश न्यायमूर्ती पटेल आणि न्यायमूर्ती जामदार यांच्या खंडपीठाने दिले होते. दरम्यान, दीड महिन्यापूर्वी न्यायमूर्ती काथावाला आणि न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांच्या खंडपीठापुढे जिल्ह्यातील १५ संस्थांच्या याचिका होत्या. खंडपीठाने निवडणुकांना तोंडी स्थगिती दिली होती. ती स्थगिती दुसऱ्या दिवशी झालेल्या सुनावणीत उठवली. तसेच सर्व १५ संस्थांच्या याचिका फेटाळून लावत निवडणुका घेण्याचे आदेश दिले. दरम्यान, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या वतीने कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यास प्राधिकरणाने मंजुरी दिली. आता सोमवारपासून जिल्हा बँकेची रणधुमाळी सुरू होत आहे. विधान परिषद निवडणुकांचा धुरळा खाली बसेपर्यंत आता जिल्हा बँक निवडणुकीच्या निमित्ताने राजकारण तापणार आहे.

### असा असेल निवडणूक कार्यक्रम

| | |
|---|---|
| अर्ज दाखल करणे : | २९ नोव्हेंबर ते ३ डिसेंबर |
| छाननी : | ६ डिसेंबर |
| उमेदवार यादी प्रसिद्ध : | ७ डिसेंबर |
| अर्ज माघारीची मुदत : | ७ ते २१ डिसेंबर |
| चिन्ह वाटप : | २२ डिसेंबर |
| मतदान : | ५ जानेवारी २०२२ |
| मतमोजणी : | ७ जानेवारी २०२२ |

# कोरोनाने मृत्यू झालेल्यांच्या नातेवाईकाना मिळणार ५० हजार

## जीआर जारी; राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून वितरण

मुंबई : कोरोनाने निधन पावलेल्या व्यक्तींच्या जवळच्या नातेवाईकांना ५० हजार रुपयांचे सानुग्रह सहाय्य राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. लाभार्थ्यांना मदतीची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत देण्याबाबत ऑक्टोबर महिन्यात केंद्र व राज्य सरकारला सुप्रीम कोर्टाने आदेश दिले होते. त्याबाबतचा शासन आदेश (जीआर) शुक्रवारी जारी झाला.

राज्यात ज्यांचे कोरोनाने निधन झाले आहे अथवा कोरोनाचे निदान झाल्यावर ज्यांनी भीतीने आत्महत्या केली आहे, अशा व्यक्तींच्या नातेवाईकांना ही मदत मिळणार आहे. दरम्यान, ही मदत देण्यापूर्वी संबंधितांच्या मृत्यूच्या दाखल्याची पडताळणी केली जाणार आहे. शिवाय संबंधित नातेवाईकांना वेब पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. अर्जदार स्वत: किंवा सेतू केंद्रात किंवा ग्रामपंचायतीत CSC-SPV मधून अर्ज करू शकतील. या कामासाठी नव्याने वेबपोर्टल पुढील आठवड्यातच विकसित करण्यात येणार आहे. त्या वेब पोर्टलवर ऑनलाईन अर्ज कसा करावा तसेच संपूर्ण या योजनेची तपशीलवार कार्यपद्धती याची माहिती असेल. हे वेब पोर्टल कार्यान्वित झाल्यानंतर सर्व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणे याबाबत आपल्या स्तरावर याबाबतची माहिती जनतेपर्यंत पोहोचवावी तसेच याबाबत प्रसिद्धी करावी, असे शासन आदेशात म्हटले आहे.

# नांदेड ,पांगरी परिसरातील डेन्टल महाविद्यालयात १०० जणांचा अवयवदान सन्कल्प ...

.आज जागतिक अवयवदान दिनाच्या निमित्ताने,डेन्टल महाविद्यालयात , अवयवदान जनजागृती कार्यक्रम संपन्न झाला .यावेळी महाविद्यालयाचे व्यवस्थापकिय सन्चालक श्रीनिवास कासवा , फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बाशा ,डेन्टल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भद्राराव ,कार्यालयीन अधीक्षक दिपक शिंदे आणि कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माधव अटकोरे यांची प्रमुख उपस्थिती होती . सकाळी वाजता सुरु झालेल्या कार्यक्रमात जणांची उपस्थितीती होती . प्रारंभीच माधव अटकोरे यांचा सत्कार झाला आणि त्यानतर ,, शासनाने. आगष्ट रोजी मन्जूर केलेली , अवयदान प्रतिज्ञा सर्वांकडून वदवुन घेण्यात आली . कार्यक्रमात अवयदानाची माहिती देताना , अटकोरे म्हणाले ,आजचा दिवस महाराष्ट्रासाठी आनन्दाचा आहे ,कारण देशातील अवयदान चळवळीत महाराष्ट्र हा नंबर वन ठरला आहे ,यापूर्वी तामिळनाडू घ्या मोहन फौंडेशनच्या प्रथम क्रमांक होता ,मात्र आता महाराष्ट्राने भरारी मारली आहे .पाच वर्षांपासून मी या चळवळीत काम करीत आहे ,याच विषयाचा ध्यास आणि अभ्यास करताना सतत भटकंती केली .दोन. लाख लोकांना भेटलो ,विस हजार जणांना अवयवदानाचे वचनपत्र भरून देऊन डोनर कार्ड मिळवून दिले .एकिकडे भटकंती आणि दुसरीकडे शासनाचा पाठपुरावा केला .हा विषय. शालेय अभ्यासक्रमात घेण्याची वारंवार विनंती केली ,शेवटी शासनाने माझी विनंती मान्य केली आणि दहावी सायन्स पुस्तकात अवयदान हा धडा समाविष्ट केला./ काळात या विषयावर शेकडो लेख लिहीले ,, अवयदान पार्थिवाचे देणे या पुस्तकाची निर्मिती केली ,दोन आव्रतीमधील तीन हजार प्रती पैकी तब्बल अडीच हजार प्रती महाराष्ट्रातील मान्यवरांना आदरपूर्वक भेट दिल्या ,हे करताना पैशाचा तसुभरही विचार केला नाही . चळवळीला वेग आला . नांदेडकरांनी साथ दिली .एवढेच नव्हे तर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अभ्यास मंडळाचे सन्दर्भ ग्रन्थ म्हणून पुस्तकाला मान्यता दिली त्याचा आनंद वाटतो . अवयदान विषयाचे महत्त्व लक्षात घेऊन अनेक विद्यार्थी पिएचडी करीत आहेत हा चळवळीचा विजय आहे .असे सांगून अटकोरे म्हणाले ,आपण सर्व जाणकार आहात ,माणुस मेल्यानंतर त्याचे काहीच शिल्लक राहत नाही . ब्रेनडेड अवस्थेत अवयदान आणि मरणोत्तर देहदान हा विषय आपण आपल्या परिसरातील लोकांना पटवून द्यावा आणि माणुसकीचे दर्शन घडवावे . अटकोरे यांचे भाषण हे कौतुकास्पद असल्याची प्रतिक्रिया व्यवस्थापकिय सन्चालक श्रिनिवास कासवा यांनी दिली .या सुंदर कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगिताने करण्यात आली ्

**चालणे : सर्वात सामान्य व्यायाम...परंतु सर्वात जास्त प्रभावी**

# आपण दररोज १० हजार पावले का चालले पाहिजे ?

• The New York Times
दैनिक दिव्य मराठीशी विशेष करारांतर्गत

*निरोगी राहण्यासाठी दिवसातून १०,००० पावले चालणे हे लोकांसाठी नित्याचे झाले आहे. मग १०,००० पावलेच का? वेगवेगळ्या संशोधनांत असे आढळले की, व्यक्ती दररोज सरासरी १०,००० पावले चालली तर **शरीराला ७ मोठे फायदे होतात. हे फायदे कोणते ते जाणून घ्या...***




अमेरिकेच्या राष्ट्रीय आरोग्य संस्था आणि रोग नियंत्रण व प्रतिबंधक केंद्राच्या शास्त्रज्ञांनी जवळपास पाच हजार महिला व पुरुषांच्या माहितीचे विश्लेषण केले. त्यात असे आढळले की, रोज आठ हजार पावले चालल्यास कर्करोग, मधुमेह आणि हृदयविकारासारख्या आजारामुळे येणाऱ्या मृत्यूचा धोका ५० टक्के कमी होतो. जर रोज बारा हजार पावले चालल्यास हा धोका ६५ टक्के कमी होतो. मग हे चालणे कुठे बाहेर असो की, घरातल्या खोल्यांमध्ये मारलेल्या चकरा असो.

## शरीराला होणारे ७ फायदे

### १) रोजच्या चालण्याने हृदयाचा धोका १९% कमी होतो

• नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनमध्ये प्रकाशित संशोधनानुसार, रोज पायी चालण्याने रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण वाढते. त्यामुळे हृदयविकाराचा धोका १९ टक्के कमी होतो. इतकेच नाही, तर स्ट्रोकचा धोकाही एकतृतीयांश कमी होतो.

### २) मेंदू ६० टक्के अधिक सर्जनशील होतो

• जर्नल ऑफ एक्सपेरिमेंटल सायकॉलॉजी, लर्निंग, मेमरी अँड कॉग्निशनच्या संशोधनानुसार, चालण्यामुळे मेंदूतील रक्तप्रवाह वाढतो. त्यामुळे मेंदूच्या सामंजस्याची क्षमता चांगली होते. परिणामी व्यक्तीची सर्जनशीलता ६० टक्क्यांपर्यंत वाढते.

### ३) इम्युनिटी : शरीरातील आजाराचा धोका २६% घटतो

• ब्रिटिश जर्नल ऑफ स्पोर्ट्स मेडिसिनच्या अनुसार, आपण आठवड्यात पाच दिवसही चालायला गेलो, तर आजाराचा धोका हा चक्क २६ टक्क्यांपर्यंत घटतो. त्यामुळे हाडांची घनता वाढून तेसुद्धा मजबूत होतात.

### ४) मधुमेहाचा धोका ६०% कमी, ग्लुकोज लेव्हल कंट्रोल

• अमेरिकन डायबिटीस असोसिएशनच्या अनुसार, चालण्यासारख्या शारीरिक हलचालींमुळे स्नायू रक्तप्रवाहात असलेल्या ग्लुकोजचा उपयोग जास्त करतात. त्यामुळे शरीरात उपलब्ध असलेले इन्सुलिन प्रभावीपणे कार्य करण्यास मदत होते. त्यामुळे मधुमेहाचा धोका ६० टक्क्यांपर्यंत कमी होतो.

### ५) रक्तदाब ४ पॉइंटपर्यंत कमी केला जाऊ शकतो

• अमेरिकन डायबिटीस असोसिएशनने प्रकाशित केलेल्या संशोधन अहवालानुसार, रोज चालण्यामुळे शरीरातील स्नायू कडक होणे कमी होते. त्यामुळे रक्ताभिसरण सुलभ होते. अनियमित रक्तदाब जवळपास चार पॉइंटपर्यंत कमी होतो.

### ६) कर्करोग आणि लठ्ठपणाचा धोका ४० ते ५०% कमी होतो

• वेब एमडीच्या अनुसार, १७ हजार लोकांवर केलेल्या संशोधनात असे आढळले की, चालण्यामुळे कर्करोगाचा धोका ४० ते ५० टक्के कमी होतो. जर्नल सायन्स डायरेक्टच्या शोधानुसार, रोज सकाळी एक तास चालल्यास लठ्ठपणाची शक्यता ५० टक्के कमी होते.

### ७) नैराश्याचा धोका २६% पर्यंत कमी होतो

• यूएस नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनमध्ये प्रकाशित संशोधनानुसार, चालण्यामुळे शरीर एंडॉर्फिन आणि डोपामाइनसारखे न्यूरोट्रांसमीटर सोडते. यामुळे व्यक्तीची मन:स्थिती आनंदी राहते. नैराश्याचा धोका २६ टक्क्यांपर्यंत कमी होतो.




# देवाचा हिशोब पक्का असतो, त्यातून कोणाचीही सुटका नाही...

एक फकीर आपल्या स्वानंदात मदमस्त होत राम नाम घेत एका गावातून दुसऱ्या गावी जात होता . पावसाचे दिवस असल्याने वातावरण प्रसन्न आणि थंडगार होते. फकीर गाणी गात एका हलवायाच्या दुकानासमोरून जात होता.

त्यावेळेस दुकानातून गरमागरम जिलबी आणि खमंग समोशांचा वास येत होता. फकीराची भूक चाळवली. तो क्षणभर तिथे घुटमळला पण जास्त वेळ थांबला नाही. हलवायाने ही बाब हेरली आणि पाठमोऱ्या फकीराला बोलावून एक प्लेट जिलेबी आणि एक प्लेट समोसा खाऊ घातला. तृप्तीचा ढेकर आणि पोटभर आशीर्वाद देऊन फकीर पुन्हा आनंदात रामनाम घेत पुढे निघाला.

रसनातृप्ती केल्याबद्दल त्याने मनोमन देवाचे आणि हलवायलाचे पुन्हा आभार मानले. आनंदाच्या भरात त्याने रस्त्याच्या मध्ये साचलेल्या डबक्यात लहान मुलांसारखी उडी मारली. त्याला गंमत वाटली. पण पुढच्याच क्षणी एका माणसाने त्याची गचांडी आवळली आणि म्हणाला, 'काही अक्कल आहे का? तू उडवलेल्या चिखलामुळे माझ्या बायकोची नवी कोरी साडी खराब झाली. असे म्हणत त्याने फकिराच्या सणकन मुस्कटात लगावली.

काही क्षणांपूर्वी आनंदात असलेला फकीर डबडबलेल्या डोळ्यांनी आकाशाकडे बघत म्हणाला, 'देवा, तुझी लिला न्यारी. कधी गरमागरम जिलबी, समोसे खाऊ घालतोस, तर कधी सणसणीत चपराख! चिखलाने माखलेला फकीर स्वत:वर हसत हसत उठला.

त्याला मारून पुढे गेलेला बाईकस्वार काही अंतरावर बाईकवरून घसरून पडला. डोके दगडावर आपटले, रक्त येउ लागले. लोक गोळा झाले. त्याची बायको उठून उभी राहिली आणि नवऱ्याला सावरू लागली. जमा झालेल्या गर्दीला म्हणाली, 'त्या फकिराने शाप दिला म्हणून हा अपघात घडला असणार!

लोकांना हातसफाईला निमित्त मिळाले. गर्दी फकीराच्या दिशेने धावली. ती त्याला मारणार, तेवढ्यात फकीर लोकांना उद्देशून म्हणाला, 'मला जरूर मारा, पण माझा अपराध काय ते तरी आधी सांगा! गर्दीने दूर बोट दाखवत त्या दाम्पत्याला शाप दिल्याचे म्हटले.

त्यावर हसून फकीर म्हणाला, 'माझ्या शापाने काय होणारे? हा तर देवाचा हिशोब होता, त्याने तो पूर्ण केला. त्या माणसाला त्याच्या प्रियजनाला झालेला त्रास बघवला नाही म्हणून त्याने मला मारले, तसे देवाला त्याच्या प्रियजनाला झालेला त्रास बघवला नाही, म्हणून त्याला शिक्षा दिली. हिशोब पूर्ण झाला!

म्हणून लोकहो, कर्म करताना कायम भान ठेवा, देव सगळ्या कर्मांचा हिशोब ठेवतो आणि गुण-दोष, सत्कर्म, कुकर्म या सगळ्यांचा हिशोब व्याजासकट परत करतो.


धनवन्तरी बाबा

"करा अवयवदान, वाचवूया दुसऱ्यांचे प्राण

संयोजक : श्री मोरेश्वरनाथ सेवा प्रतिष्ठान, कसबा बावडा, कोल्हापूर.

मासिक **शिखरावरी**

पेपर घरपोच मिळण्यासाठी
आजच वर्गणीदार व्हा ! वार्षिक वर्गणी १३० रुपये
मोबाईल नं. ९१५५६७७७७७, ९८५०६१९२३३


योगेश अग्रवाल
संस्थापक शिखरावरी

## वर्गणी फॉर्म

नाव :

पत्ता :

गाव : ता.

जिल्हा :

मोबा :

| | | |
|---|---|---|
| वार्षिक वर्गणी | : १००+30 (पोस्टीग) | = १30 |
| त्रैवार्षिक वर्गणी | : | = 300 |
| पंचवार्षिक वर्गणी | : | = ५00 |
| सन्मानलीय वर्गणी | : | = २१00 |

जाहिरात विषय

| | | |
|---|---|---|
| पूर्ण पान | : | ५०००=०० |
| अर्धे पान | : | ३०००=०० |
| पाव पान | : | २०००=०० |

**वर्गणी पाठविण्याच पत्ता व बँक खाते** अनुराग डायनिंग, ८१४ ऑर्चिड अपार्टमेंट, देवणे कॉलनी, कारंडे मळा, कोल्हापूर.
बँकेचे नाव : बँक ऑफ इंडिया, लक्ष्मीपुरी शाखा कोल्हापूर,
बँक अकौटंट नंबर : ०९००२०११००००८९१ (IFSC Coad : BKID0000900)

संपर्क : **हॉटेल शिवाय** कलेक्टर ऑफिससमोर नागाळापार्क, कोल्हापूर. **गिरीजा गोडे** स्वेल्ट कॅनरा बँकेच्यासमोर बस रूट, ६ वी गल्ली राजारामपुरी कोल्हापूर. **सुरेखा पाटोळे** सि. सि. नं. ५९५/ए ब्लॉक नं. १२३, गुरूकृपा कॉलनी, दत्तमंदिराच्याजवळ, रामानंदनगर कोल्हापूर. **अशिष मोबाईल अँड कॉम्युटर सर्विसिंग सेंटर,** भगवा चौक, कसबा बावडा, कोल्हापूर.

।। श्री गणेश प्रसन्न ।। ।। श्री गुरूदेव दत्त प्रसन्न ।।
।। श्री स्वामी समर्थ प्रसन्न ।। ।। श्री गजानन महाराज प्रसन्न ।।

## गॅस सेव्ह, होम सेफ

**गॅससेफ (डिवायस)**

१) गॅसची बचत आणि सुरक्षा.
२) सिलेंडरवर एक्सपायर मुद्दत लिहिलेली असते.
३) सिलेंडरमधून गॅसचा पूर्ण वापर.
४) बर्नल ला गॅसचा जेवढा वापर असेल तेवढा गॅस बर्नल पर्यंत सोडतो.
५) रबर पाईप उंदराने कुडतरल्याने गॅस रिसाव होऊ शकतो.
६) गॅस कमी करून वापर असताना गॅस वाऱ्यांने विझू शकते.
७) ज्या घरात किंचन कट्टा नसतो त्या घरात गॅस शेगडी खाली ठेवली जाते. म्हणून गॅस रिसाव होण्याची शक्यता जास्त असते.
८) गॅस संपन्याची कल्पना आधीच मिळत राहते.
९) सिलेंडरमधून पूर्ण गॅससेफ डिवायसमध्ये पूर्ण गॅस वापरण्याची क्षमता आहे.
१०) गॅस सेफ डिवायस वीस वर्षे काम करण्याची क्षमता आहे.
११) गॅस डिवायस वापरत असताना तीन वर्षांची वॉरंटी आहे.
१२) गॅस सेफ वापरल्या गॅस विस्फोट होत नाही.
१३) जरी विस्फोट झाल्यास १५ कोटी रुपये पर्यंतचा उपकरण बिमा पॉलिसी आहे.
१४) गॅससेफची किंमत २४९९/- आहे.

## गॅससेफ वापरा, सुरक्षित रहा!

श्री. योगेश अग्रवाल (mo. 9155677777) (w : 9225314151)
युनिक ट्रेडर्स, ऑर्चिड अपार्टमेंट, ८१४/ए, ई वॉर्ड
कारांडे मळा, ताराबाई पार्क कोल्हापूर.
बचत गट ॲडव्हायजर : रेखा बिरंजे

ruturaj printer : 9765566801